भातसा धरण विभाग क्र.१ भातसानगर अंतर्गत असलेल्या भातसा प्रकल्प दवाखाना येथील ४ अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः अपदे २०१७/प्र.क्र.३२५/आरोग्य-३ अ

१० वा मजला, संकुल इमारत,
जी.टी.रुग्णालय आवार, मुंबई ४०० ००१
दिनांक : २८ मार्च,२०१९

वाचा -

१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.अपदे २०१६/प्र.क्र.५६/आरोग्य-३ अ, दि. २८ जानेवारी, २०१९.

२) सहसंचालक,आरोग्य सेवा (रुग्णालये) राज्यस्तर,मुंबई यांचे पत्र क्र.संआसे/कक्ष-३/टे-१२/मुंबईमंडळ,ठाणे/अपदेमुदतवाढ/१९-२०/२३५४/१९ दि.२/०२/२०१९

३) शासन निर्णय,वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/आ.पु.क.दि.२१/०२/२०१९.

शासन निर्णय

उपरोक्त अनुक्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये भातसा धरण विभाग क. १ भातसानगर अंतर्गत असलेल्या भातसा प्रकल्प दवाखाना येथील ४ अस्थायी पदांना दि. १/१०/२०१८ ते दि. २८/२/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती

२. आता या शासन निर्णयान्वये भातसा धरण विभाग क. १ भातसानगर अंतर्गत असलेल्या भातसा प्रकल्प दवाखाना येथील ४ अस्थायी पदांना दि. १/३/२०१९/ ते दि. ३०/०९/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

३. सदर पदांवरील खर्च खालील लेखाशिर्षातून खर्ची घालण्यात यावा आणि हा खर्च सन २०१९-२०२० या वर्षाकरीता मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

मागणी क्रमांक आर-१
४७०१-मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्प यावरील भांडवली खर्च
०१ मोठे प्रकल्प,८०-सर्वसाधारण
००१-संचालन व प्रशासन,०१-आस्थापना (लाभक्षेत्र विकास व्यतिरिक्त)
(०१)(०२) अधिक्षक अभियंता ठाणे पाटबंधारे मंडळ,ठाणे (४७०१६५५१)

४. शासन निर्णय,वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क. दि.२१ फेब्रुवारी, २०१९ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारा नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२५१२५२५४८०१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shamraoji Kaurte

Digitally signed by Rajendra Shamraoji Kaurte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ed4c738df60ac2ac776b9e2481f77ad50aba9dc28bb31a482e03c7ee7b6f64d8, serialNumber=7caa550613a8c4cb7c593368faa24e20d6f8985f510118e6fc1af8b04a443ee8, cn=Rajendra Shamraoji Kaurte
Date: 2019.03.28 16:55:13 +05'30'

रा.शा. कौरते

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व लेखापरिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
३. संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
४. सह संचालक, आरोग्य सेवा,रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई
५. उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे
६. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, ठाणे
७. सहायक अधिक्षक अभियंता,पाटबंधारे प्रकल्प,ठाणे
८. उप कार्यकारी अभियंता,भातसा धरण विभाग क्र.१,भातसानगर,जि.ठाणे
९. जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे
१०. वित्त विभाग (व्यय १३)/वित्तीय सुधारणा-१, मंत्रालय, मुंबई
११. अवर सचिव/कक्ष अधिकारी (सेवा-२, सेवा-३, सेवा-५, अर्थसंकल्प), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. निवडनस्ती (आरोग्य-३ अ)